Blue Bird
PAGE NO.:
DATE

# १. सत्ता आणि अधिकार

१) सत्ता -

प्रस्ताविक -

राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय राजकारणाचा केंद्रबिंदू म्हणजे सत्ता होय. प्रत्येक व्यक्ति सत्तेसाठी धडपडत असतो सत्तेभोवती राजकारण फिरत असते. आधुनिक काळात तर राजकीय सत्तेत खूपच महत्व प्राप्त झाले आहे. प्लेटो, ॲरी स्टॉटल च्या काळामध्ये ही सत्तेला महत्व होते. राजेशाहीत राज्याच्या हातात सत्ता असते तर लोकशाहीत जनतेच्या हातात सत्ता असते. रसेल, कॅटलीन, चार्ल्स, कॉरचेले इ. विचारवंतानी सत्तेच्या बाबत विचार मांडला आहे.

२) सत्तेचा अर्थ व व्याख्या -

इतराच्या कार्यावर, वर्तनावर, निर्णयावर प्रभाव पाडणे नियंत्रण ठेवणे वर्चस्व प्रस्थापीत करणे म्हणजे सत्ता होय.

सत्तेच्या अर्थाबाबत अनेकांनी आपआपल्या दृष्टीकोनातून अर्थ्माग व्याख्या किंवा व्यवस्था सांगण्याचा खालील प्रमाणे प्रयत्न केला आहे.

① मॉर्गेथा -

"लोकावर प्रस्थापित झालेला आणि सत्तेने चालत असलेले नियंत्रण म्हणजे सत्ता होय"

② डॉल -

"व्यक्तिच्या किंवा समुहाच्या व्यवहारात आपल्या इच्छेचा बदल घडवू आणण्याची क्षमता म्हणजे सत्ता होय"

Scanned with CamScanner

## + व्याख्येवरून निष्कर्ष -

सत्तेच्या व्याख्ये वरील निष्कर्ष पुढील प्रमाणे सांगता येईल.

1) सत्ता म्हणजे इतरांनवर प्रभाव पडण्याची क्षमता होय.
2) इतराच्या कार्यावर नियंत्रण ठेवणे म्हणजे सत्ता होय
3) इतराच्या निर्णयावर परीणाम परीवर्तन घडविणे म्हणजे सत्ता होय
4) इतराच्या मनामध्ये विचारामध्ये बदल करणे नियंत्रण ठेवणे.

## + सत्तेचे प्रकार / स्वरूप

सत्ता ही संकल्पना प्राचीन काळापासून आधुनिक काळापर्यंत राजकारणात महत्वाची आहे या सत्तेचे अनेक प्रकार सांगी-तले जातात. मॅक्स वेबर या विचारवंतानी सत्तेची तीन प्रकार सांगितले आहे.

1) पारंपारिक सत्ता
2) कायदेशीर सत्ता
3) करिश्मात्मक सत्ता

## ① पारंपारीक स्वरूपाची सत्ता

पारंपारीक स्वरूपाची सत्ता ही वंश परंपरेच्या तत्वार आधारीत असते राजेशाही व्यवस्थेचा स्विकार करण्यात देशामध्ये अशा प्रकारची सत्ता दीसून येते वंश परंपरेचे तत्व म्हणजे राजाच्या किंवा सत्ताधीश व्यक्तीच्या मृत्युनंतर त्याच्या मुलाला अपोआप सत्ता प्राप्त होते होय. अशा प्रकारच्या सत्तेला पारंपारीक स्वरूपाची सत्ता म्हणतात. अशा प्रकारची सत्ता लोकशाही व्यवस्थेत दीसुन येत नाही.

उदा - इंग्लंडचा राजाची राष्ट्रप्रमुखाची सत्ता ही पारंपारीक स्वरूपाची सत्ता आहे.

Scanned with CamScanner

2) कायदेशीर स्वरूपाची सत्ता

व्यक्तिला किंवा नागरीकाला कायद्याद्वारे किंवा नियमाद्वारे सत्ता प्राप्त झाल्यास तिला कायदेशीर स्वरूपाची सत्ता म्हणतात. कायदेशीर स्वरूपाची सत्ता लोकशाहि शासन व्यवस्थेचा स्वीकार करण्याचा देशात दीसून येते.

उदा - राष्ट्रपती, राज्यपाल, पंतप्रधान, मुख्यमंत्री यांना प्राप्त झालेली सत्ता ही कायदेशीर स्वरूपाची आहे. कारण त्यांची कायद्यानुसार निवड किंवा नेमणुक झालेली असते.

3) करिश्मात्मक स्वरूपाची सत्ता

करिश्मात्मक सत्तेला भुरळपाडणारी या नावानेही ओळखले जाते एखादया व्यक्तीकडे त्याच्या अंगभुत असलेल्या कलागुणामुळे कैशल्यामुळे कर्तत्वामुळे इतरावर प्रभाव पाडण्याची क्षमता असते त्यास करिशात्मक स्वरूपाची सत्ता असे म्हणतात.

उदा. स्वातंत्र्यापुर्वी माहत्मागांधी, डॉ बाबासाहेब अंबेडकर लोकमान्य टीळक यांच्याकडे अशाप्रकारची सत्ता होती. सध्या अन्ना हजारे, बाबा आमटे, बाळासाहेब ठाकरे, मेधा पाटकर इत्यादीचा उल्लेख करता येईल.

अशा प्रकारे मॅक्स वेबर यांनी वरील प्रमाणे सत्तेचे तीन प्रकार सांगितले आहे या प्रकाराशिवाय ही सत्तेचे अनेक प्रकार सांगता येतील

1) लष्करी स्वरूपाची सत्ता
2) आर्थिक स्वरूपाची सत्ता
3) क्रांतीकारि स्वरूपाची सत्ता.

1) लष्करी स्वरूपाची सत्ता

लष्करी सत्ता ही कायदेशीर व पारंपारीक सत्तेला अपवाद आहे असीम सपूर्ण सत्ता लष्कराच्या किंवा लष्कर प्रमुखाच्या किंवा सैन्याच्या हातात असते

Scanned with CamScanner

Blue Bird
PAGE NO.:
DATE

उदा - पाकीस्तान मध्ये परवेज मुशरफला प्राप्त झालेली सत्ता

2) आर्थिक सत्ता

आर्थिक सत्ता पैशाच्या, उद्योगाच्या श्रीमंतीच्या आधारावर प्राप्त होते त्याच्याकडे कोट्यावधी, अब्जावधी रुपये असतात त्याचा साहजीकच इतरांवर प्रभाव पडत असतो.
उदा - टाटा, बिरला, अंबानी इत्यादी.

3) क्रांतीकारि सत्ता

क्रांती म्हणजे बदल, परीवर्तन होय ही क्रांती रक्तरंजीत असो किंवा रक्तवीरहीत असो क्रांतीच्या आधारावर एखाद्या व्यक्तीला किंवा व्यक्ती समुदायला सत्ता मिळते त्या सत्तेला क्रांतीकारि सत्ता असे म्हणतात
उदा - 1949 मध्ये चीनमध्ये माओच्या नेतृत्वाखाली क्रांती झाली क्रांती नतर चीनमध्ये माओची सत्ता आली

★ अधीसत्ता -

प्रस्तावना -

सत्ता आणि अधीसत्ता या दोन्ही संकल्पना महत्वाच्या आहेत प्रत्यक्ष व्यवहारात त्या एकाच अर्थाने किंवा एक मेळासारख्या वापरल्या जातात. परंतु सुक्ष्मदृष्ट्या विचार केल्यास सत्ता आणि अधीसत्ते मध्ये फरक दीसून येतात सत्ता ही व्यक्तीशी निगडीत असते तर अधीसत्ता विशिष्ट पदाशी निगडीत असते सत्तेप्रमाणेच अधीसत्तेचा ही विचार प्राचीन काळापासून करण्यात आलेला आहे.

अधीसत्तेचा अर्थ व व्याख्या -

सत्ता किंवा शक्ती म्हणजे इतरावर नियंत्रण ठेवण्याची प्रभाव पाडण्याची क्षमता होय तर अधीसत्ता म्हणजे सत्तेला मान्यता देणे होय". अधीसत्तेचा बाबत अनेकानी खालील

प्रमाणे व्याख्या केली आहे.

① रॉबर्ट डाल :-

" प्रभावाच्या अधिक कार्यक्षम प्रकार म्हणजे अधिसत्ता होय"

② केबीस आणि डेव्हिड :-

" राजकीय अधीसत्ता म्हणजे शासन करण्याच्या हक्का ला मान्यता होय".

③ व्याख्येवरून निष्कर्ष -

वरील व्याख्ये वरून खालील प्रमाणे निष्कर्ष काढता येईल

1) केवळ सत्ता किंवा शक्ती म्हणजे अधीसत्ता नव्हे.

2) केवळ प्रभाव पाडणे म्हणजे अधीसत्ता नव्हे.

3) सत्तेला, प्रभावाला कायदयाची मान्यता असणे म्हणजे अधीसत्ता होय.

+ अधीसत्तेचे प्रकार -

① पांरमपारीक स्वरूपाची अधीसत्ता

② कायदेशीर स्वरूपाची अधीसत्ता

③ करिश्मात्मक स्वरूपाची अधीसत्ता

④ लष्करी स्वरूपाची अधीसत्ता

⑤ आर्थिक स्वरूपाची अधीसत्ता

⑥ क्रांतीकारी स्वरूपाची अधीसत्ता

+ अधिसत्तेचे वैशिष्टे

Blue Bird PAGE NO.: DATE

Scanned with CamScanner

1) सामाजिकता -

समाजिकता हे एक अधीकाराचे महत्वाचे वैशिष्ट आहे अधीकार किंवा अधीसत्ता समाजामध्येच वापरता येते समाजाशिवाय अधीकार नगण्य असतात त्यांना काहीच महत्व राहत नाही. एखादया व्यक्तीला वाळवंटामध्ये किंवा जंगलामध्ये एकटे सोडून दील्यास तेथे त्याच्या अधीकार निरर्थक ठरतो कारण तिथे समाज किंवा समाजातील संस्थेचा अभाव असतो म्हणून अधीकारासाठी समाजाची सामाजिक संस्थाची आवश्यकता असते.

2) स्वाभाविकता -

अधीकार हे स्वाभावीक असतात निसर्गाकडे ते प्राप्त झालेले असतात. परंतु त्याला राज्याची किंवा कायद्याची मान्यता असते या अधीकारामध्ये जिवन जगण्याचा अधीकार व्यक्ती स्वातंत्र्याचा अधीकार बोलण्याचा अधीकार इत्यादी समावेश होतो सर्व अधीकार व्यक्तीला स्वाभाविकच जन्मताच प्राप्त झाले आहे यावरून अधीकार हे स्वाभाविक स्वरूपाचे असता असे म्हटले जाते.

3) परिवर्तनशीलता -

अधीसत्ता ही परिवर्तनशीलता स्वरूपाची असते. त्याच्यामध्ये वेळ काळ देश परिस्थिती नुसार बदल होतो काही देशामध्ये स्त्रियाना मतदानाच अधीकार नव्हता कालांतराने तो प्राप्त झाला आहे एका काळातील अधीकार दुसऱ्या काळामध्ये असेलच असे सांगता येत नाही.

4) अधीकार आणि कर्तव्य एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत -

अधीकार आणि कर्तव्य या नाण्याच्या दोन बाजू आहेत अधीकार शिवाय कर्तव्याचा आणि कर्तव्याशिवाय

अधिकारा बरोबर कर्तव्य जोडलेले असतात सामुहिक जिवना मध्ये तुमचा अधिकार हे माझे कर्तव्य ठरतात
उदा - मला बोलण्याचा, भाषण करण्याचा अधिकार आहे या अधीकाराचा वापर करताना दुसऱ्याचे मन दुखावणार नाही वाईट न बोलणे हे माझे कर्तव्य आहे तसेच दुसऱ्यांचे बोलणे एकूण घेणे हे ही माझे कर्तव्य ठरते.

5) अधीकार / अधिसत्ता हे विशेष अधीकार नाही
अधीकार हा समाजाचे हीत साधण्याचा प्रयत्न करत असतो अधीकार सर्वांना समान वापरता येतात अधी कारामधून संपूर्ण समाजाचे नैतिक हीत साधले पाहीजे एखादया अधीकारावर एखादया व्यक्तीचे किंवा संस्थेचे वर्चस्व राहत नाही कोणताही अधीकार कोणत्याही व्यक्तीची विशेष अधीकार राहत नाही.
अशा प्रकारे वरील प्रमाणे अधीसत्तेची वैशिष्टे सागता येते.

Scanned with CamScanner